|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

## बातमी क्र.१

जळगाव दि. ६ (                    ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि मुंबई येथील इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) यांच्यात मंगळवार दि.६ मार्च रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य करारावर कुलसचिव भ.भा.पाटील तसेच आयसीटीच्या अधिष्ठाता प्रा.रेखा सिंघल यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

विज्ञान व अभियांत्रिकी विषयाशी निगडीत अशा या सामंजस्य कराराचा खान्देशातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे. विद्यापीठातील विज्ञान विषयाच्या सर्व प्रशाळांना हा करार लागू होईल. करारान्वये ज्ञान, तांत्रिक सुविधा, संशोधन-विकास प्रकल्प, संयुक्तपणे परिषदांचे आयोजन, आयसीटीच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संशोधनासाठी संयुक्त प्रकल्प, संशोधक मार्गदर्शक व को-गाईड यांची नियुक्ती, प्राध्यापकांचे अदान-प्रदान होणार आहे. आयसीटी ही भारतातील नामांकित संस्था समजली जाते.

या सामंजस्य करार प्रसंगी आयसीटीच्या औषधनिर्माणशास्त्र विभागप्रमुख प्रा.मरियम देयानी, प्रा.श्रीरंग जोशी, प्रा.आर.डी.कुलकर्णी तसेच उमविच्या रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे, प्रा.व्ही.व्ही.गीते, प्रा.अमुलराव बोरसे हे उपस्थित होते.

---

## बातमी क्र.२

जळगाव दि. ६ (            ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतर्फे २३ व्या ओपन हाऊस `इन्फीनिटी- २०१८` या कार्यक्रमाचे उद्‌घाटन आयसीटी मुबंईच्या ऑईल टेक्नॉलॉजी विभागाचे प्रमुख प्रा.आर.डी.कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

यावेळी संस्थेचे माजी संचालक प्रा.सत्येंद्र मिश्र, आयसीटी मुंबईच्या प्रा.रेखा सिंघल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा.जी.ए.उस्मानी होते. समन्वयक डॉ.पी.डी.मेश्राम यांनी प्रास्ताविक केले. प्रा.कुलकर्णी यांनी अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.एम.आय.तालीब यांनी केले. डॉ.हंसराज पाटील यांनी आभार मानले. यावेळी वृक्षारोपण आणि रक्तदान शिबीर घेण्यात आले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ६ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी